नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०३/२०२५ (शनिवार) संध्याकाळ**

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे वेलतुरः—** दिनांक २८/०२/२०२५ रोजी वेलतुर पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतच्या आधारे पोलसांनी मौजा चन्ना येथे नाकाबंदी केली असता एक टाटा एस वाहन क्रमांक एम एच ४९ डी ००८७ हे वाहन संशयीत रित्या जाताना दिसल्याने वाहनास थांबवुन वाहन तपासणी केली असता वाहनामध्ये दोन गौवंश गाय व दोन गौवंश वासरू अत्यंत दाटीवाटीन कोंबुन त्यांनां क्रुरतेने दोरीच्या साहयाने बांधुन,चारापाण्याची सोय न करता घेवुन जाताना मिळुन आले. वाहन चालक नामे गुलाब संतोश चांदेकर वय ३३ वर्ष, रा पचखेडी ता. कुही जि नागपुर याला विचरापुस केली असता त्याने सदर जनावरांची वाहतुक वाहन मालक मधुकर कोडंबाजी बांगड,वय ४६ वर्ष, रा.केसोरी ता. कुही यांच्या सांगण्यावरून करत आहे असे सांगितले. वाहन मालकास विचारपुस केली असत त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष १) दोन गौवंश गाय प्रत्येकी किंमती १२,०००/— रूपये एकुण २४,०००/— रूपये २) दोन वासरू प्रत्येकी किंमती ३०००/— रूपये एकुण ६,०००/— रूपये असा ऐकुण गौवंश ३०,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे.

**आरोपी** वाहन चालक नामे गुलाब संतोश चांदेकर, वय ३३ वर्षे, रा. पचखेडी ता कुही, जि. नागपुर **२) वाहन मालक नामे** मधुकर कोडंबाजी बांगडे वय ४६ वर्षे,रा. केसोरी ता कुही , जि. नागपुर यांचेविरूद्ध कलम ११ (१) (ड), प्राण्यांचा छाळ प्रतिबंधक अधिनियम १९६०, कलम ०९ महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात अला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर